म.वि.प्र समाजाचे

गु.मा.दा कला, भ.वा.वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

सिन्नर,जि.नाशिक

“अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या शिफारसीनुसार”

सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१८ - १९

# समाजशास्त्र मंडळ उदघाटन

# ःअहवालः

प्रा.ए.एन.डिंबर

समाजशास्त्र मंडळ प्रमुख

म.वि.प्र समाजाचे

## गु.मा.दा कला, भ.वा.वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर,जि.नाशिक

# समाजशास्त्र मंडळ उद्घाटन अहवाल

गु.म.दा. कला भ.व. वाणिज्य महाविद्यालय सिन्नर येथे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या समाजशास्त्र मंडळाचे उद्घाटन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास उद्घाटक व व्याख्याते म्हणून प्रा.डी.के.सानप (सेवानिवृत्त) निफाड महाविद्यालय जि. नाशिक हे उपस्थित होते. त्यांनी समाजशास्त्र मंडळचे उद्घाटन केले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सिन्नर महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे यांनी भूषविले. प्रा.डी.के.सानप यांनी मानवी हक्क या विषयावर व्याख्यान दिले. कर्तव्य आणि हक्क या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजु असल्याने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसुत्रिच्या विचारसरणीतुन मानवी हक्काची निर्मिती होते. विद्यार्थ्यांनी मानवी हक्काचे महत्व राजकीय विचारवंतांच्या प्रेरणेतुन समजुन घेतले पाहिजे. असे प्रतिपादन निफाड महाविद्यालायाचे सेवानिवृत्त प्रा.डी.के.सनाप यांनी केले. लोकशाहीची पाळेमुळे जनतेत रूजत नाही, मानवी हक्काचे काटेकोर पालन होत नाही तोपर्यंत देशात शांतता प्रस्थापित होणार नाही. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा अर्चना पगार यांनी केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य राजेंद्र पवार, समाजशास्त्र मंडळाचे प्रमुख प्रा.ए.एन.डिंबर प्रा.आगवने, प्रा.पी.के.शिंदे, प्रा.व्ही.सी.बडवर, प्रा.कैलास गोपाळे, प्रा.जयश्री बागुल, प्रा.लक्ष्मण चांदोरे, डॉ.अशोक भवर, प्रा.दिलीप सूर्यवंशी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## समाजशास्त्रा मंडळ उदघाटन कार्यक्रमातील काही क्षणचित्र






# समाजशास्त्र मंडळ उद्‌घाटन अहवाल

## देशात मानवी हक्क संरक्षण एक समस्या - प्रा. सानप

### सिन्नर महाविद्यालयात सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्‌घाटन

। सिन्नर । वार्ताहर ।

भारतासारख्या लोकशाही देशात मानवी हक्कांची स्थिती समाधानकारक नाही. भारतामध्ये बालके, स्त्रीया, आदिवासी व्यक्ती यांच्या मानवी हक्कांची सरकार, राजकीय नेते, सनदी अधिकारी, पोलीस तसेच वेगळ्या संस्था यांच्याकडून पायमल्ली होताना दिसून येते. भ्रष्टाचार, दारिद्र, बेरोजगारी शिक्षणाचा अभाव यामुळे भारतात मानवी हक्क संरक्षण एक मोठी समस्या बनलेली आहे असे प्रतिपादन निफाड महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. के. डी. सानप यांनी केले.

सिन्नर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने जागतीक मानवहक्क दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमीत्त महाविद्यालयात सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून निफाड महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.के. डी. सानप, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे, उपप्राचार्य राजेंद्र पवार, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अरुण पोटे, राजेंद्र आगवणे, पि. के शिंदे,




अर्चना पगार, व्ही. सी. बडवर आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना प्रा. सानप म्हणाले, प्रत्येक व्यक्ती समाजाभिमुख असतो. हक्क समाजात निर्माण होतात. कर्तव्य आणि हक्क या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू असल्यामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीच्या विचारसरणीतून मानवी हक्काची निर्मिती होते. मानवी हक्कांचा जाहिरनामा १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत प्रसिद्ध केला. त्यातून अनेक हक्कांचा समावेश करून सार्वत्रिक हक्क परिस्थितीनुसार हक्कांमध्ये वाढ या सर्वांची जाणीव प्रत्येक नागरिकाला झाली. त्यामुळे मानवी हक्क राज्य संस्थेमध्ये हत्याचा मानला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जागतिक मानवी हक्काचे महत्व वेगवेगळ्या राजकीय विचारवंत यांच्या प्रेरणेतून समजून घेतले पाहिजे. भारतीय संविधानामध्ये प्रकरण-३ मध्ये जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत ते अधिकार प्रत्येक भारतीय व्यक्तीला माहित असने गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिंदे यांनी आपल्या मनोगतातून मानवी हक्काचे महत्व विशद केले. त्यांनी पर्यावरण अधिकार, माहितीचा अधिकार, अन्नसुरक्षा अधिकार इत्यादी हक्कांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेमध्ये मानवी हक्काबरोबरच शैक्षणिक हक्काचे महत्त्व समजून घेणे एक फार मोठी काळाची गरज आहे. असे स्पष्टीकरण केले. देशात आजही अराजकता असून मानवी हक्कांची पायमल्ली होताना आढळते. लोकशाहीची पाळेमुळे जो पर्यन्त जनतेत रुजत नाही, मानवी हक्कांचे काटेकोर पालन होत नाही तोपर्यंत देशात शांतता प्रस्तापित होऊ शकत नाही असेही डॉ. शिंदे म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना पगार तर आभार राजेंद्र आगवने यांनी मानले सदर यावेळी कैलास गोपाळे, जयश्री बागुल, लक्ष्मन चांदोरे, डॉ. अशोक भवर, दीपाली सूर्यवंशी यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

पुढारी

**संक्षिप्त**



सिन्नर : येथील सिन्नर महाविद्यालयात सामाजिक शास्त्र मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे.

## सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्‌घाटन

**सिन्नर :** येथील सिन्नर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिवसाचे औचित्य साधून सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात उपप्राचार्य राजेंद्र पवार, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. अरुण पोटे, राजेंद्र आगवणे, पी. के. शिंदे, अर्चना पगार, व्ही. सी. बडवर उपस्थित होते. कर्तव्य आणि हक्क या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू असल्यामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीच्या विचारसरणीतून मानवी हक्काची निर्मिती होते. विद्यार्थ्यांनी मानवी हक्काचे महत्त्व राजकीय विचारवंतांच्या प्रेरणेतून समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन निफाड महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. के. डी. सानप यांनी केले. लोकशाहीची पाळेमुळे जनतेत रुजत नाहीत, मानवी हक्कांचे काटेकोर पालन होत नाही, तोपर्यंत देशात शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही असे प्रतिपादन डॉ. शिंदे यांनी केले. अर्चना पगर यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र आगवने यांनी आभार मानले. यावेळी कैलास गोपाळे, जयश्री बागूल, लक्ष्मण चांदोरे, डॉ. अशोक भवर, दीपाली सूर्यवंशी आदींसह विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

---

## सिन्नरला सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्‌घाटन

सिन्नर : येथील सिन्नर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिवसाचे औचित्य साधून सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात उपप्राचार्य राजेंद्र पवार, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. अरुण पोटे, राजेंद्र आगवणे, पी. के. शिंदे, अर्चना पगार, व्ही.सी. बडवर उपस्थित होते. लोकशाहीची पाळेमुळे जनतेत रुजत नाहीत, मानवी हक्कांचे काटेकोर पालन होत नाही, तोपर्यंत देशात शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही, असे प्रतिपादन डॉ. शिंदे यांनी केले. अर्चना पगार यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र आगवने यांनी आभार मानले. यावेळी कैलास गोपाळे, जयश्री बागुल, लक्ष्मण चांदोरे, डॉ. अशोक भवर, दीपाली सूर्यवंशी आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत २०.१२.२८

## समाजशास्त्र मंडळ उदघाटन कार्यक्रमातील काही क्षणचित्र




प्रा . ए . एन . डिंबर

समाजशास्त्र मंडळ प्रमुख